नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/08/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :— दिनांक २०/०८/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान पिडीता/फिर्यादी ही १० व्या वर्गात शिक्षण घेत असुन यातील आरोपी नामे— आयान अजिज शेख, वय १८ वर्ष रा. वार्ड क्र. ०४ बुट्टीबोरी ता. जि. नागपुर हा फिर्यादीचे शाळेसमोर व घरासमोर येवुन फिर्यादीचा पाठलाग करून फिर्यादी सोबत बोलण्याचा प्रयत्न करत असतो यातील फिर्यादी वय १५ वर्ष ही दिनांक २०/०८/२०२३ रात्री २१/०० वा. सुमारास घरातील कचरा फेकायला घराचे बाहेर गेली असता आयान शेख हा तिचे घरासमोर आला व फिर्यादीस बघुन त्याने म्हटले की तु माझे सोबत बोलत का नाही असे म्हणाला असता फिर्यादी त्याला म्हणाली की मला तुझे सोबत काही बोलायचे नाही व तु माझा पाठलाग करणे बंद कर तेव्हा फिर्यादीची आई ही घराबाहेर आली असता आईने आयान यास तु माझे मुली सोबत कशाला बोलत आहे असे म्हटले असता आयान हा तेथुन धावत निघुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द ३५४ (ड) भादवी सहकलम पोस्को ११(४), १२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक रेजिवाड मॅडम मो. नं. ८८८८८६२२५७ या करीत आहे.

## चोरी

१) पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा चिचाळा शिवार येथे दिनांक २०/०८/२०२३ चे सायं. १७.०० वा. ते दिनांक २१/०८/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— उमेश रामदासजी महाजन वय ४२ वर्ष रा. नेहरू वार्ड रामटेक याने स्वत:चे शेतात पाणी देण्यासाठी अॅको कंपनीची निळया रंगाची दिड एच पी चीप पाण्याची मोटर किंमती ५,०००/— रूपये हि लावली असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे शेतातील तलावात लावलेली जुनी वापरती मोटार चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मंगेश सोनटक्के ब. नं. ९७८ मो. नं. ९८३४४५३५६५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा नगरधन शिवार येथे दिनांक २०/०८/२०२३ चे १३.३० वा. ते दिनांक २१/०८/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विक्की उर्फ विलास रतीराम कामळी, वय २७ वर्ष, रा. कवडक दुधाळा ता. रामटेक याने स्वत:चे शेतात धानाला पाणी देण्यासाठी २ एच पी ची ओपनवेल कंपनीची मोटार किंमती १०,०००/– रूपये हि लावली असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे शेतातील तलावात लावलेली जुनी वापरती मोटार चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ओमप्रकाश रेहपाडे ब. नं १८१२ मो. क्र. ७०३८२४२०५५ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. बेला** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बेला शेतशिवार येथे दिनांक २१/०८/२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रमोद श्रावण हागे, वय ३५ वर्ष, ता. उमरेड जि. नागपुर हा आपल्या शेतात बैलांना चारा करण्याकरीता गेला असता **आरोपी नामे– विशाल प्रमोद येसनसुरे, रा. भाडेश्वर** हा शेताजवळील रोडवर उभा होता व शेतातुन आरोपी नामे– दिलीप मानीक सहारे रा. बोरीमजरा हा गोठयातील लोखंडी फास किंमती ७००/– रुपये व लोखंडी कुलरचा टप किंमती २००/– रुपये हा चोरी करुन घेवुन जातांनी दिसला असता दोन्ही आरोपी हे चोरी करण्याचे उद्देशाने मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुनिल आदमने ब. नं ४२९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर